प्रेस नोट

हडपसर पोलीसांची कारवाई सराईत चोरटयाकडुन सुमारे साडेपाच लाख रुपये किंमतीचे चोरीचे वाहने जप्त :-

दि.०६/०६/२०१९ रोजी हडपसर पोलीस स्टेशन हददीत होणा-या वाहन चोरीच्या अनुषंगाने हददीत पेट्रोलींग करीत असतांना हडपसर पोलीस स्टेशनकडील तपासपथकातील सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोना/कुसाळकर, पोशि/चित्ते, पोशि/शाहीद शेख, पोशि/ अमित कांबळे असे पेट्रोलिंग करीत असतांना पोशि/ चित्ते व पोना/ कुसाळकर यांना बातमीदामार्फत बातमी मिळाली की, एक इसम हा वैभव थिएटअरजवळ संशयीत रित्या मोटार सायकलवर उभा आहे. सदर इसमास सापळा रचुन पकडुन त्याचेकडे असलेल्या मो.सा.सह ताब्यात घेवुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदरची मो.सा ही चोरल्याचे सांगीतले. सदर इसमाचे नाव योगेश ऊर्फ प्रविण ऊर्फ टकल्या वजाळे वय-२१ रा.घोरपडे वस्ती, लोणीकाळभोर ता.हवेली जि.पुणे असे असुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने पुणे शहर व पुणे ग्रामीण हददीतुन दुचाकी व चारचाकी वाहने चोरल्याची कबुली दिली आहे. सदरचा इसम हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर पुणे शहर व पुणे ग्रामीण येथे विवीध ठिकाणी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. सदर इसमाने पुणे ग्रामीण व पुणे शहर येथे चोरी केल्याचे कबुल केले असुन त्याचेकडुन एकुण ०७ दुचाकी व एक चार चाकी जप्त करण्यात आलेल्या असुन एकुण ०९ गुन्हे उघडीकीस आलेले आहेत.

१) हडपसर पोस्टे ३०५/१९ भादवि कलम ३७९
२) हडपसर पोस्टे ३२७/१९ भादवि कलम ३७९
३) हडपसर पोस्टे ३५१/१९ भादवि कलम ३७९
४) हडपसर पोस्टे ३६७/१९ भादवि कलम ३७९
५) हडपसर पोस्टे ४९२/१९ भादवि कलम ३७९
६) हडपसर पोस्टे १२४६/१७ भादवि कलम ३९२
७) यवत पोस्टे २०३/१९ भादवि कलम ३७९
८) वानवडी पोस्टे १६१/१९ भादवि कलम ३७९
९) लोणीकंद पोस्टे ४५९/१७ भादवि कलम ३७९

सदर आरोपीकडुन तपासपथकाने केलेल्या चौकशी दरम्यान हडपसर पोलीस स्टेशनचे एकुन ०६ गुन्हे, वानवडी कडील ०१, यवत पोस्टे कडील ०१, लोणीकंद पोलीस स्टेशनकडील १ गुन्हा असे एकुन ०९ गुन्हे उघडकीस आणले असुन आरोपीकडुन एकुन चोरीच्या ०७ दुचाकी, व एक चारचाकी असा एकुन ५,५२,०००/-रु किंमतीचा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे सदर आरोपीस मा.न्यायालयासमोर हजर करण्यात आले असुन पुढील तपास हडपसर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे हे करीत आहे.

सदरची कामगीरी मा.सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो.हडपसर विभाग पुणे,यांचे सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, सपोनि संजय चव्हाण, पोहवा/ रमेश साबळे पोहवा/राजेश नवले, पोहवा/ औचारे, पोहवा/पठाण, पोना/अनिल कुसाळकर,पोशि/अमित कांबळे पोना/ गणेश दळवी, पोना/ भोजराव,पोना/टिळेकर, पोशि/ शाहीद शेख, पोशि/ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.

(रघुनाथ जाधव)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
हडपसर पोलीस स्टेशन,पुणे


NO PARKING